प्रकाश गोळे

# पर्यावरण - एक उपेक्षित क्षेत्र

पुष्कळदा विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मला विचारतात, "आम्हाला पर्यावरणाच्या क्षेत्रात पुढे काम करायचं आहे. आम्ही काय करावं? कोणतं शिक्षण घ्यावं?" मी मग विचार करू लागतो, या विद्यार्थ्यांना काय सांगू? या क्षेत्रात शिक्षणाच्या कोणत्या संधी आहेत? त्यांना नोकरी, व्यवसाय, संशोधन या गोष्टी कुठे उपलब्ध होतील?

अनेक विद्यापीठांत आज पर्यावरण विज्ञान किंवा एन्व्हायर्नमेंटल सायन्सेस हा विषय पदवीसाठी आणि पदव्युत्तर म्हणून घेता येतो. याचा भर मात्र प्रदूषण नियंत्रणावर आहे. मात्र या अभ्यासक्रमाला येणारे विद्यार्थी अभियांत्रिकीचे नसल्याने आणि कारखान्यांतील प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारणे आणि चालविणे यासाठी अभियंत्यांचे ज्ञान आवश्यक असल्याने, निव्वळ हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर कारखान्यातून नोकरी मिळणे कठीण जाते. पर्यावरण आणि जीवशास्त्र यांचा संबंध जोडणारे अभ्यासक्रम डेहराडूनची वाइल्ड लाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, भोपाळची फॉरेस्ट मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट या ठिकाणी उपलब्ध आहेत. पक्षीशास्त्र, सूक्ष्म जीवशास्त्र, सागरी जीवशास्त्र यातील छोटेखानी अथवा पत्रद्वारे (कॉरस्पॉन्डन्स) शिक्षण देणारे अभ्यासक्रम बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी, कोइमतूरची सॅकॉन या संस्था चालवितात. आपल्या इकॉलॉजिकल सोसायटीतर्फे पुणे आणि मुंबई येथे पर्यावरणाचे सर्वंकष शिक्षण देणारा एक वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम चालविला जातो.

मात्र सरकारी संस्थांमधून (उदा. विद्यापीठे) हे अभ्यासक्रम १५-१६ वर्षांपूर्वीच चालू झाले असले तरी युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशन सारख्या संस्थांनी विद्यार्थ्यांना नोकरी आणि व्यवसायाच्या संधी कशा निर्माण होतील, याबाबत मार्गदर्शन केल्याचे दिसत नाही. वाइल्ड लाइफ इन्स्टिट्यूट, फॉरेस्ट मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट यांमधून बाहेर पडणारे विद्यार्थी निरनिराळ्या राज्यांतील वन आणि वन्य प्राणी विभागात नोकरीला लागतील, अशीही तरतूद या संदर्भात केलेली नाही. माझ्या माहिती-प्रमाणे शहरांतील असंख्य तरुण-तरुणी आज पर्यावरण क्षेत्रात कार्य करायला उत्सुक आहेत. पण त्यांना योग्य संधी कुठेच मिळत नाही. या संदर्भात महाराष्ट्राच्या वनाधिकाऱ्यांना मी विनंती केली होती की त्यांनी या तरुण-तरुणींना निरनिराळ्या अभयारण्यात काम करण्यासाठी ॲप्रेंटिस म्हणून घ्यावे म्हणजे त्यांना अनुभव मिळेल आणि वनाधिकाऱ्यांना मदत करणारे एक प्रशिक्षित "केडर" निर्माण होईल. पर्यावरण संरक्षणाच्या कार्याला मोठी चालना मिळेल. पण या सूचनेचा गांभीर्याने विचार झाला नाही. सरकारी खात्यांनी जनतेला विश्वासात न घेण्याची ब्रिटिशांनी घालून दिलेली परंपरा अजूनही निष्ठेने पाळली जाते!

अलीकडे मात्र सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरण हा विषय शिक्षणात सक्तीचा केला पाहिजे, असा आदेश दिल्याने हा विषय शिकवू शकणाऱ्या शिक्षकांची प्रचंड गरज निर्माण झाली आहे. एकट्या महाराष्ट्रात चाळीस ते पन्नास हजार शिक्षकांची गरज आहे. दुर्दैवाने शिक्षणात या विषयाचा समावेश कसा करावा, त्यामध्ये नेमक्या कोणत्या गोष्टी समाविष्ट करायच्या आणि हा कसा शिकवायचा यांबाबत सध्या मार्गदर्शन उपलब्ध नाही. पाठ्यपुस्तक मंडळाने या विषयावर जी पाठ्यपुस्तके तयार केली आहेत, ती या विषयासंबंधीच्या वैचारिक गोंधळाची निदर्शक आहेत. त्यामुळे पर्यावरण विषयाचे सम्यक ज्ञान शिक्षकांना देऊन त्यांना प्रशिक्षित तयार करणे हे सुद्धा मोठेच आव्हान आपल्यापुढे आहे. विद्यापीठ पातळीवरही या आव्हानाला सामोरे कोणी गेलेले दिसत नाही. त्यामुळे गेली १५-१६ वर्षे हा विषय विद्यापीठांत शिकविला जात असूनही त्यासाठी स्वतंत्र शिक्षकवर्ग (फॅकल्टी) तयार करणे कोणत्याच विद्यापीठाला जमलेले नाही.

याचे कारण असे की पर्यावरण हा विषय आंतरविद्याशाखीय (इन्टर-डिसिप्लिनरी) असा आहे. त्याचे शिक्षण इतर विद्याशाखांतून आलेले प्राध्यापक स्वतंत्रपणे देऊ शकत नाहीत. माझ्या मते इकॉलॉजिकल सोसायटीतर्फे चालविला जाणारा अभ्यासक्रम हा एक खास आंतरविद्याशाखीय पद्धतीने शिक्षण देऊ शकतो. या अभ्यासक्रमात जैवशास्त्रांबरोबरच इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र तसेच परिस्थितिकी (इकॉलॉजी), लँडस्केप इकॉलॉजी आणि पाणी, माती, डोंगर, वने, झुडपे, सागरकिनारे यांच्या पर्यावरणीय व्यवस्थापनावर भर देण्यात येतो. हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना स्वयंसेवी संस्थांमध्ये मोठीच मागणी आहे. तसेच काहींनी स्वतंत्र व्यवसाय चालू केले आहेत. बिल्डर्स, लँड डेव्हलपर्स, रिसॉर्टस प्रस्थापित करणारे यांना आपली बांधकामे पर्यावरणाला अनुकूल असावीत असे वाटू लागले आहे. त्यांना योग्य सल्ला हा अभ्यासक्रम पूर्ण करणारे देऊ शकतात. ग्लोबल वॉर्मिंग सारखे जे आंतरराष्ट्रीय प्रश्न आहेत, त्या संदर्भातही ते सल्ला देऊ शकतात, त्यासंबंधीच्या योजना कार्यान्वित करू शकतात. परिस्थितीवर (इकॉलॉजी) सल्ला देणे, हे नवे क्षेत्र आता उपलब्ध होत आहे.

हा अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थी आज शाळेत आणि महाविद्यालयीन पातळीवर ज्या शिक्षकांची आवश्यकता आहे, त्यांना पर्यावरणाचे सम्यक ज्ञान देऊ शकतील. एकूण पर्यावरणाची जाण जसजशी वाढत जाईल, सर्वसामान्य जनता आपल्या जीवनाच्या दर्जाबद्दल (क्वॉलिटी ऑफ लाइफ) जशी सजग होत जाईल, तसा या क्षेत्रांत नोकरीच्या, व्यवसायाच्या, शिक्षणाच्या आणि संशोधनाच्या संधी वाढत जातील, असे दिसते.

— प्रकाश गोळे